Ref. No.: CML/51/2025-26/NSE

Date: 08th September, 2025

**To,**
**The Manager - Listing Compliance**
**National Stock Exchange of India Limited**
**Exchange Plaza, Plot No. C-1, Block-G,**
**Bandra Kurla Complex, Bandra (E),**
**Mumbai-400051**

**Company Symbol: CMNL**

Dear Sir/Madam,

**Subject: Publication of Notice of Remote e-voting regarding Annual General Meeting (AGM) to be held on 30th September, 2025.**

We hereby inform that we have published the Notice regarding remote e-voting in Marathi and English Edition newspapers on 08th September, 2025.

Please find enclosed herewith a copy of the paper clippings of the same.

We request you to take the above information on your records and disseminate the same on your respective website.

Thanking You,

Yours faithfully,
**For CHAMAN METALLICS LIMITED**

CHAMAN METALLICS LIMITED TADALI M.H.

RAHUL RELWANI

Digitally signed by RAHUL RELWANI
Date: 2025.09.08 18:28:56 +05'30'

**Rahul Relwani**
**Company Secretary and Compliance Officer**

# मूल शहरातील भूखंडाच्या किमती भिडल्या गगनाला!

## जागा घेऊन घर बांधणे सर्वसामान्यांच्या झाले आवाक्याबाहेर

धनराज रामटेके
लोकमत न्यूज नेटवर्क

**मूल :** शहरातील भूखंडाच्या किमती सर्वसामान्यांना परवडण्यासारख्या राहिल्या नसून मागील दोन वर्षांमध्ये दरात प्रचंड वाढ झाली आहे. सतत वाढत चाललेल्या किमतीमुळे भूखंड खरेदी करून त्यावर घर बांधणे हे सर्वसामान्य नागरिकांना न परवडण्यासारखे झाले असून, सर्वसामान्य लोकांचे शहरात घर बांधून राहण्याचे स्वप्न भंग होत असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

मूलवरून नागपूर, ब्रह्मपुरी, गडचिरोली, चामोर्शी, चंद्रपूरकडे जाणारे मार्ग आहेत. असे असले तरी मागील पाच-सहा वर्षांपूर्वी मूल शहरातील भूखंडाला तेवढी मागणी नव्हती. त्यामुळे भूखंडाचे दरही कमी होते. मागील दहा-बारा वर्षांपूर्वी शहरातील वसाहतीमध्ये प्रतिचौरस फूट ३०० ते ४०० रुपये अशा दराने भूखंड मिळत होते. मात्र, आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मूल शहरात अनेक विकासात्मक कामे केली. त्यामुळे मूल शहराचा चेहरामोहरा बदलला. त्यामुळे मूल शहराकडे अनेक नोकरवर्गाचा कल वाढला आहे.



### दलालामुळेही वाढल्या भूखंडाच्या किमती

**मूल शहरात भूखंड खरेदी विक्री करून देणाऱ्या दलालांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. आज भूखंड खरेदी करा, उद्या तोच भूखंड जास्त दराने विक्री करून देतो म्हणून दलाल खरेदीदारांना आकर्षित करीत असल्याने भूखंडाच्या दरात मोठी वाढ होत असल्याची नागरिकांत चर्चा सुरू आहे. तर शहरातील काही व्यापारी आपल्या पत्नीच्या नावाने भूखंड खरेदी करून जास्त दराने भूखंड विक्री करण्याचा व्यवसाय करीत असल्याने दरात वाढ होत आहे.**

### सर्वसामान्यांच्या स्वप्नावर विरजण

शहरात असलेल्या शैक्षणिक, आरोग्य व इतर सोयीसुविधांमुळे शहराच्या सभोवतालच्या ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना शहरात राहण्याची इच्छा होणे स्वाभाविक आहे. मात्र, भूखंडाच्या वाढलेल्या किमतीमुळे भूखंड खरेदी करून त्यावर घर बांधणे आवाक्याबाहेर असल्याने त्यांच्या शहरात राहण्याच्या स्वप्नावर विरजण पडले आहे.

### नोकरदारांची मूल शहराला पसंती

मूलवरून ब्रह्मपुरी, गडचिरोली व चंद्रपूर येथे ये-जा करण्यासाठी नोकरदारांना सोयीचे होत असल्याने व मुलांच्या शैक्षणिक दृष्टिकोनातून सोयीचे असल्याने नोकरदार मूल शहरात राहणे पसंत करीत असल्याचे दिसत आहे. मूल शहरातील सभोवतालच्या गावातील नागरिक गुंतवणूक करण्याच्या व भविष्यात शहरात स्थायिक होण्याच्या दृष्टिकोनातून शहरातील भूखंड खरेदी करून ठेवत आहेत. त्यामुळे भूखंडाच्या दरात खूप वाढ होत आहे.

# क्विक Update



## नऊ फुटांच्या अजगराला दिले जीवदान

**शंकरपूर :** येथील तरुण पर्यावरणवादी मंडळाच्या सर्पमित्राने नऊ फुटांच्या अजगराला जीवदान दिलेले आहे. त्यांनी गुरुवारी दुपारी शेतात जाऊन हा अजगर पकडला. डोमा येथील तुषार मालके यांच्या खापरी येथील शेतात महिलांना मोठा साप धानाच्या बांधीत आढळून आला. त्यांनी लगेचच शंकरपूर येथील तरुण पर्यावरणवादी मंडळाचे सर्पमित्र सोहेल शेख यांना फोन केला.

### निधन वार्ता

#### वासुदेव कोहळे



**पळसगाव (पि) :** चिमूर तालुक्यातील पळसगाव येथील रोजगार सेवक वासूदेव जानबा कोहळे (५६) यांचे ६ सप्टेंबरला पळसगाव येथे राहत्या घरी दुपारी ४ वाजताच्या सुमारास निधन झाले. त्याच्या पार्थिवावर बाम्हण तलाव परिसरात अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## मुकदमगुड्यात दारूबंदी आणि व्यसनमुक्तीसाठी सभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**जिवती :** महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील वादग्रस्त मुकदमगुडा गावात दारूबंदी आणि व्यसनमुक्तीचा संदेश देण्यासाठी जिवती पोलिस ठाण्याचे ठाणेदार प्रवीण जाधव यांच्या उपस्थितीत एक विशेष सभा आयोजित करण्यात आली.

या सभेला गावातील महिला, पुरुष आणि तरुणांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. ठाणेदार प्रवीण जाधव यांनी सभेत उपस्थितांना दारू आणि इतर व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'दारू आणि व्यसनांमुळे केवळ व्यक्तीचेच नव्हे, तर कुटुंब आणि समाजाचेही मोठे नुकसान होते. व्यसनमुक्ती हा गावाच्या विकासाचा पाया आहे.' त्यांनी गावकऱ्यांना दारूबंदी कायम ठेवण्यासाठी आणि तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सभेत गावातील महिलांनी दारूबंदीला पाठिंबा दर्शवत गावात अवैध दारूविक्री रोखण्यासाठी कठोर कारवाईची मागणी केली. तरुणांनीही व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प व्यक्त केला.





सततच्या पावसामुळे पिके अशी पाण्याखाली होती.

## वरोरा तालुक्यात पावसाने हजारो हेक्टर शेती प्रभावित

लोकमत न्यूज नेटवर्क

**वरोरा :** तालुक्यात गेल्या काही दिवसांत ७५ मी.मी.च्या वर पडलेल्या मुसळधार पावसाने वरोरा तालुक्यातील नदी, नाल्याला पूर आल्याने नाल्या काठावरील हजारो हेक्टर शेतजमिनीवरील कापूस आणि सोयाबीन हे पिके पाण्याखाली आल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.

शेतकरी पुन्हा चिंताग्रस्त झाला आहे, तरी सदर परिसरात तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी कुडबाचे माजी सभापती तथा संचालक राजू चिकटे यांनी शासनाकडे केली आहे. तालुक्यात कापूस हे प्रमुख पीक तर सोयाबीन हे दुय्यम पीक आहे.

यावर्षी शेतकऱ्यांनी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी कृउबाचे माजी सभापती राजू चिकटे यांनी केली. शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने कापसाची लागवड केली होती. पिके दोन ते तीन फुटांपर्यंत वाढली असताना गेल्या २४ तासांपूर्वी झालेल्या पावसामुळे हाताबाहेर आहे. तालुक्यात मुसळधार पावसामुळे नदी, नाल्याला पूर आल्याने काठावरील जमिनीत मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून शेतांना तलावाचे स्वरूप आले आहे. परिणामी, हिरवेगार कापसाचे पीक पाण्याखाली जाऊन भुईसपाट झाली आहेत. वरोरा तालुक्यातील शेगाव बु., चारगाव, चारगाव खुर्द, भटाळा आसाळा, बोरगाव, बांद्रा सालोरी, दिंडोळा, जामगाव येथील शेतकऱ्यांच्या कापूस आणि सोयाबीन पिकाची नासाडी झाली.

## शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पोंभुर्णा :** भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येते. शिक्षक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रमाता विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय देवाडा खुर्द येथे विद्यार्थांचे स्वयंशासन उपक्रम घेण्यात आले.

विद्यार्थ्यांनी एक दिवस स्वतः शाळा चालवली. समृद्धी मंडरे या विद्यार्थिनीने प्राचार्य म्हणून व इतर विद्यार्थ्यांनी सहकारी शिक्षक म्हणून अतिशय शिस्तबद्ध आणि उत्तम नियोजन करून स्वयंशासन उपक्रम पार पाडले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य दिलीप मॅकलवार यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पार्पण करण्यात आले. शालेय स्वयंशासन यांचे मूल्यमापन करण्यात आले.

# कोरपना येथे उपविभागीय कार्यालयासाठी दोन्ही तहसीलदारांकडून आयुक्तांना अभिप्राय सादर

### लवकरच महसूलच्या कामांना मिळणार गती

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोरपना :** कोरपना येथे उपविभागीय अधिकारी (महसूल) कार्यालय स्थापन करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त नागपूर यांनी मागवलेल्या माहितीवरून कोरपना व जिवती तहसीलदारांनी बावीस विवरणाची माहिती सादर केली आहे.

यात तालुक्याची लोकसंख्या, एकूण गावे, साझे, महसुली मंडळ, भौगोलिक क्षेत्र, लोकसंख्या, आदिवासी लोकसंख्या, एकूण खातेदार, जमीन महसूल, मुख्यालय ठिकाण, मुख्यालयाचे अंतर, दळणवळणाची साधने, ग्रामपंचायत संख्या, विधानसभा लोकसभा मतदारसंघ तपशील, स्थानिक स्वराज्य संस्था तपशील, आदिवासी डोंगरी क्षेत्र, ऐतिहासिक धार्मिक पर्यटन, मध्यवर्ती स्थान, उपलब्ध इमारत, जागा, मुख्यालय ठिकाणी असलेली इतर कार्यालय, वाहन उपलब्धता तपशिलासह अभिप्राय अशा २२ मुद्द्यांची विवरणात्मक माहिती दोन्ही तहसीलदारांनी उपविभागीय अधिकारी राजुरा यांच्यामार्फत पाठविली. राजुराचे आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष आशिष ताजने व नागरिकांनी ही मागणी महसूलमंत्री यांना लेखी निवेदनाच्या माध्यमातून केली होती. त्यावर सकारात्मक पावले उचलत ही माहिती मागविण्यात आली.

**आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात नागरिकांनी ही मागणी महसूलमंत्री यांच्याकडे केली होती.**

### कोरपन्यात उपविभागीय स्तरावरचे होणार चवथे कार्यालय

१ कोरपना येथे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग, उपविभागीय डाक निरीक्षक ही तीन उपविभागीय स्तरावरील कार्यालय कोरपना, जिवती दोन्ही तालुक्यांसाठी कार्यरत आहे.

२ उपविभागीय अधिकारी महसूल कार्यालय स्थापन झाल्यास चवथे उपविभाग कार्यालय कोरपना शहरात उपलब्ध होईल, तर जिल्ह्यात हे नववे उपविभागीय अधिकारी महसूल कार्यालय असेल. कोरपना येथे दोन्ही तालुक्यांसाठी उपविभागीय अधिकारी महसूल कार्यालयाची निर्मिती होण्यासाठी मार्ग सुकर झाला आहे.

**"उपविभागीय अधिकारी कार्यालय स्थापनेसंदर्भात माहिती अहवाल मागविण्यात आला होता. तो सकारात्मक अहवाल उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना पाठवण्यात आला आहे.**

**पल्लवी आखरे,** तहसीलदार, कोरपना

मस्ट READ

# चिमूर नगर परिषदेची प्रभाग रचना जाहीर !

### १० प्रभागांतून निवडणार २० नगरसेवक : नगराध्यक्ष थेट मतदारांतून निवडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**चिमूर :** चिमूर नगर परिषदेची निवडणूक येत्या काही महिन्यांत होण्याची शक्यता वर्तविली जात असून, राज्य शासनाच्या निर्देशानुसार चिमूरनगर परिषदेने प्रारूप प्रभाग रचना तयार करून प्रसिद्ध केली आहे.

सन २०१५ च्या प्रभाग रचनेप्रमाणे यंदाच्या निवडणुका होणार नसून, यावर्षी दोन सदस्यांचा एक प्रभाग अशी रचना करण्यात आली असून, जनगणना झाली नसली तरी नगरसेवक संख्येत वाढ झालेली आहे. यंदा १० प्रभागांतून २० नगरसेवक निवडण्यात येणार आहेत. यामध्ये एका प्रभागातून दोन नगरसेवक निवडण्यात येणार, अशी रचना जाहीर करण्यात आली आहे.

मागील निवडणुकीपेक्षा यावर्षी प्रभाग रचनेत प्रभाग संख्या कमी झाली. मात्र, सदस्य संख्या वाढविण्यात आली आहे. यावर्षी एका प्रभागातून दोन नगरसेवकांना निवडून द्यायचे असून, नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडून येणार आहे. चिमूर नगर परिषदेची पंचवार्षिक मुदत ३० नोव्हेंबर २०२० मध्ये संपुष्टात आली. तेव्हापासून चिमूर नगर परिषदेवर प्रशासकीय राजवट लागू आहे. दरम्यान, महाविकास आघाडीचे सरकार सत्तेतून पायउतार होऊन महायुतीचे सरकार सत्तेवर आले. त्यानंतर महायुतीने जुनी रचना रद्द केली होती. परंतु त्यानंतर निवडणुका झाल्या नाहीत. असे असतानाच, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे राज्य शासनाच्या निर्देशानुसार चिमूर नगर परिषदेने प्रारूप प्रभाग रचना तयार करून प्रसिद्ध केली आहे. या प्रारूप आराखड्यावर नगर परिषदेने ३० ऑगस्टपर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या. यावर तीनच हरकती प्राप्त झाल्या. यावर सुनावणी घेऊन अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. यामुळे आता नगर परिषदेच्या निवडणुका लवकरच होणार स्पष्ट झाले आहे.

**राज्य शासनाच्या निर्देशानुसार चिमूर नगर परिषदेने प्रारूप प्रभाग रचना तयार करून प्रसिद्ध केली आहे.**

आखाडा जि.प. निवडणुकीचा





### एक मतदार करणार तीन मतदान!

नवीन प्रभाग रचनेनुसार एका प्रभागात दोन नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. तसेच नगराध्यक्ष थेट मतदारांतून निवडून येणार आहे, त्यामुळे चिमूर येथील मतदारांना आता दोन नगरसेवक व एक अध्यक्ष, असे तीन मतदान करावे लागणार आहे.

### सभागृहात तीन नगरसेवकांची भर!

नोव्हेंबर २०१५ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत १७ प्रभागांतून १७ नगरसेवक निवडून द्यायचे होते. यावर्षी मात्र दहा प्रभागांतून २० नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यामुळे आता मागच्या तुलनेत तीन नगरसेवकांची सभागृहात भर पडणार आहे.

चमन मेटालिक्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ए-२६, एम.आय.डी.सी, तडाली ग्रोथ सेंटर, तडाली, चंद्रपूर (महा.) ४४२४०६
कॉर्पोरेट कार्यालय: अग्रवाल कॉम्प्लेक्स, पांडे नर्सिंग होम समोर, समता कॉलनी, रायपूर (छग.) ४९२००१, संपर्क क्र.: ०७७१-४२५९१००
ई-मेल: cs@cmlgrgroup.com वेबसाईट: www.cmlgrgroup.com
CIN: L27100MH2003PLC143049

२२वी वार्षिक आम सभा आणि ई-व्होटिंग माहितीची सूचना

एतद्वारे सूचना देण्यात येते की;
१. चमन मेटालिक्स लिमिटेड (दी कंपनी) ची २२वी वार्षिक आम सभा (एजीएम किंवा सभा) ही एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये दिल्यानुसार व्यवसाय व्यवहाराकरिता नॅशनल सेक्युरीटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) यांचेद्वारे पुरविण्यात आलेल्या व्हिडीओ कॉन्फरसिंग (व्हीसी)/ इतर दृकश्राव्य (ऑडिओ व्हिज्युअल) साधने (ओएव्हीएम) सुविधे मार्फत मंगळवार, ३० सप्टेंबर २०२५ ला दु. १२:३० वा. (भाप्रवे) ला घेण्यात येईल. कंपनीज ॲक्ट, २०२३ (दी ॲक्ट), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, २०/२०२० दिनांक ०५ मे २०२० आणि एमसीएव्दारे या संदर्भात जारी करण्यात आलेले नंतरचे परिपत्रक, अद्यावत ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ (सामूहिकपणे 'एमसीए परिपत्रक' म्हणून उल्लेखित) आणि सेक्युरीटीज ॲंड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) द्वारे जारी परिपत्रक दिनांक १२ मे २०२० आणि १५ जानेवारी २०२१, १३ मे २०२२, ०५ जानेवारी २०२३, ०६ ऑक्टोबर २०२३, ०७ ऑक्टोबर २०२३ आणि ३ ऑक्टोबर २०२४ अनुक्रमे (सामूहिकपणे 'सेबी' परिपत्रक म्हणून उल्लेखित), (सामूहिकपणे 'संबध्द परिपत्रक' म्हणून उल्लेखित) आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲंड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (सेबी एलओडीआर) च्या सर्व लागू तरतुदींचे अनुपालन करून, कंपनीने शुक्रवार ०५ सप्टेंबर २०२५ ला वित्तीय वर्ष २०२४-२५ (वार्षिक अहवाल) ॲक्सेस करण्यासाठी वेब लिंकसह कंपनीच्या २२व्या एजीएमची सूचना ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/ रजिस्ट्रार्स आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए)- एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड/ डिपॉझिटरीज/ डिपॉझिटरी पार्टीसिपंट यांचेकडे नोंदणीकृत आहेत अशा सदस्यांना केवळ इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठविण्यात आली आहे. २. वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना कंपनीची वेबसाइट www.cmlgrgroup.com वर, एनएसडीएलची वेबसाइट www.evoting.nsdl.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) ची वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे. (अ) सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंग, (ब) व्हीसी/ओएव्हीएम मार्फत सभेमध्ये भाग घेणे आणि जुळणे, (क) सभे दरम्यान ई-व्होटिंग, आणि (ड) ई-मेल आयडीची नोंदणी यावरील विस्तृत मार्गदर्शन एजीएमच्या सूचनेमध्ये उपलब्ध आहे. ३. सुदूर (रिमोट) ई-व्होटिंग: कंपनीज (व्यवस्थापन व प्रशासन) रूल्स २०१४ च्या रूल २० सह वाचल्या जाणाऱ्या अधिनियमाचे सेक्शन १०८, एमसीए/ सेबीच्या इतर लागू परिपत्रकासह वाचल्या जाणाऱ्या सेबी एलओडीआरचे रेगुलेशन ४४ चे अनुपालन करून, कंपनी आपल्या सदस्यांना एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार व्यवहार करावयाच्या व्यवसायासंदर्भात एजीएम पूर्वी सुदुर ई-व्होटिंग करण्याची सुविधा तसेच एजीएममध्ये ई-व्होटिंगची सुविधा देत आहे आणि या उद्देशाकरिता, कंपनीने इलेक्ट्रॉनिक साधना मार्फत व्होटिंग सुविधाजनक करण्याकरिता एनएसडीएलला नियुक्त केले आहे. सुदुर ई-व्होटिंगकरिता सविस्तर सूचना एजीएम बोलाविण्याच्या सूचनेमध्ये दिलेली आहे. सदस्यांना विनंती आहे की त्यांनी खालील ध्यानात घ्यावेः
**अ. सुदूर ई-व्होटिंग सुविधा शनिवार, २७ सप्टेंबर, २०२५ ला सकाळी ०९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि सोमवार, २९ सप्टेंबर २०२५ ला सायं. ०५:०० वा. (भाप्रवे) समाप्त होईल. त्यानंतर मतदानाकरिता सुदूर ई-व्होटिंग मॉडयूल एनएसडीएलद्वारे निष्क्रिय करण्यात येईल आणि सदस्यांना उक्त तारीख आणि वेळे नंतर सुदूर ई-व्होटिंगच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिकली मतदान करण्याची परवानगी राहणार नाही.** ब. सदस्यांचा मतदान अधिकार **मंगळवार, २३ सप्टेंबर, २०२५ ('कट ऑफ डेट')** रोजीनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या इक्वीटी शेअर भांडवलाच्या त्यांच्या शेअरच्या प्रमाणात राहतील. सदस्यांना एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएम कार्यवाहीदरम्यान इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टिमच्या माध्यमातून मतदानासाठी सुविधा प्रदान करण्यात येईल आणि एजीएममध्ये सहभागी होणारे सदस्य, ज्यांनी सुदूर ई-व्होटिंगद्वारे ठराव(रिझोलूशन)वर याआधी आपले मतदान केलेले नाही, ते अध्यक्षाच्या घोषणेनंतर या ठरावावर मतदान करण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर करण्यास पात्र असतील. ज्या सदस्यांनी एजीएमच्या आधी सुदूर ई-व्होटिंगद्वारे ठरावावर आपले मत दिलेले आहे, ते सुद्धा व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये सहभागी होण्यास पात्र असतील, परंतु त्यांना पुन्हा अशा ठरावावर मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. एजीएमच्या दिवशी सुदूर ई-व्होटिंग मॉड्यूल सभेच्या समारोपानंतर १५ मिनिटे मतदान करण्यासाठी एनएसडीएलद्वारे निष्क्रिय करण्यात येईल. क. कोणतेही शेअरहोल्डर्स ज्यांनी कंपनीचे शेअर्स घेतलेले आहेत आणि नोटीस पाठविल्यानंतर कंपनीचे सदस्य बनलेले आहेत आणि शेवटची तारीख (कट ऑफ डेट) अर्थात मंगळवार, २३ सप्टेंबर, २०२५ रोजी शेअर्स धारण करीत आहेत, त्यांनी evoting@nsdl.com वर एक विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करावे. तथापि, जर एकादी व्यक्ती सुदूर ई-व्होटिंगकरिता एनएसडीएलकडे याआधीच नोंदणीकृत असेल, तर सदस्य मतदान करण्यासाठी आपल्या विद्यमान यूजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल. ड. एखादी व्यक्ती शेवटच्या तारखेला रोजी सदस्य नसेल तर त्यांनी ही नोटीस केवळ माहितीकरिता आहे असे समजावे. ज्या सदस्याचे नाव सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा शेवटच्या तारखेला डिपॉजिटरीजद्वारे सांभाळलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंदविले आहे, त्यांना केवळ एजीएमपूर्वी सुदूर ई-व्होटिंग सुविधेचा तसेच एजीएममध्ये ई-व्होटिंगचा लाभ घेण्याचा अधिकार राहील. ई. ई-व्होटिंग संबंधित कोणत्याही शंका/तक्रारी असल्यास, सदस्य/लाभार्थी मालकांनी www.evoting.nsdl.com च्या ''डाऊनलोड'' सेक्शनमध्ये उपलब्ध शेअरहोल्डर्सकरिता नेहमी विचारण्यात येणारे प्रश्न ('एफएक्यू') आणि शेअरहोल्डर्सकरिता ई-व्होटिंग यूजर मॅन्युअल पाहावे किंवा ०२२-४८८६७००० वर कॉल करावा किंवा evoting@nsdl.com वर एक विनंती पाठवावी किंवा श्री. अमित विशाल, सहायक उपाध्यक्ष किंवा सुश्रि पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक, एनएसडीएल यांच्याशी, नामित ईमेल आयडीः amitv@nsdl.com किंवा pallavid@nsdl.com वर संपर्क साधावा. एनएसडीएलचा पत्ता प्लॉट सी-१ ब्लॉक जी, एक्सचेंज प्लाझा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई, महाराष्ट्र ४०००५१ आहे. फ. डिपॉजिटरीज मार्फत लॉगिनशी संबंधित कोणत्याही तांत्रिक समस्यांकरिता डीमॅट मोडमधील प्रतिभूती धारण केलेले शेअरहोल्डर्स (अ) एनएसडीएल सोबत प्रतिभूती धारण केलेले सदस्यांनी एनएसडीएल हेल्पडेस्क evoting@nsdl.com वर विनंती पाठवुन संपर्क करावा किंवा ०२२-४८८६ ७००० वर संपर्क करावा. (ब) सीडीएसएल सोबत प्रतिभूती धारण केलेले सदस्यांनी सीडीएसएल हेल्पडेस्क helpdesk.evoting@cdslindia.com वर विनंती पाठवून संपर्क करावा किंवा १८००-२१-०९९११ वर संपर्क करावा.
स्थानः रायपूर
दिनांकः ०८ सप्टेंबर, २०२५
कृते चमन मेटालिक्स लिमिटेड
स्वा/- राहुल रेलवानी,
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

जाहिर नोटीस
कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी, चिमुर जि.चंद्रपूर
एम.जे.सी.क्र.३९/२०२५ पेशी तारीख:-२९/०९/२०२५
अर्जदारः- १. श्री. विवेक वसंता माकडे वय ३३ वर्षे, धंदा : शेती रा.नेहरू वार्ड, चिमूर, ता.चिमूर जि.चंद्रपूर
- विरूध्द -
गैरअर्जदारः- कोणीही नाही.
सर्व जनतेला याव्दारे सुचित करण्यात येते की, मृतक विठ्ठल रामजी कामडी हे दि. २१.१०.२००५ रोजी मरण पावले. उपरोक्त अर्जदार यांना त्यांच्या शासकीय व खाजगी कामाकरिता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने उपरोक्त अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी या न्यायालयात रितसर अर्ज दाखल केला आहे.
त्याअर्थी, जर कोणाला उपरोक्त अर्जदार हे मृतकाचे वारस नव्हे असे समजविण्याचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रकाशीत झाल्याचे तारखेपासुन एक महिण्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा, सदरहू मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू न्यायालय अर्जदारांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना कायद्यानुसार वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारित करेल.
आज तारीख २८ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहिने कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.
शिक्का
स्वा/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर चिमूर

Shree tuljabhavani sevabhavi shaikshanik va samajik shikshan sanstha Kothari
HI-TECH COLLEGE OF PHARMACY MORWA, CHANDRAPUR
INST CODE 4210
ADMISSION NOTIFICATION 2025-26 for B. PHARM DIRECT SECOND YEAR (LATERAL ENTRY)
Applications are invited from eligible candidates for admission (Against Cap) Seats after CAP Rounds (if any) Only for B. PHARM. DIRECT SECOND YEAR (LATERAL ENTRY).
Eligibility Criteria: as per the rules and regulations set by the STATE CET CELL and the Government of Maharashtra.

| SN | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Date of sale acceptance of application form | 07/09/2025 to 08/09/2025 Upto 05:00 PM |
| 2 | Display of college provisional merit list on Notice Board | 09/09/2025, Upto 03:00 PM |
| 3 | Submission of grievance (If Any) | 09/09/2025, Upto 05:00 PM |
| 4 | Display of college final merit list on Notice Board | 10/09/2025, Upto 11:00 PM |
| 5 | Admission round ACAP for all categories Reporting & Cut-off date for admission | 11/09/2025, Upto 05:00 PM |

Note : Any change in the schedule, will be display on college notice board.
Contact no. 9420608853 Website: www.htcop.org
Chairman Principal

Somayya
INSTITUTE OF TECHNOLOGY, CHANDRAPUR
Approved by AICTE New Delhi, DTE Mumbai & affiliated to DBATU University
Applications Invited For Institute Level Seats and Vacant Seats Against CAP
Last Date Of Admission 13th Sep. 2025 For B.Tech. First Year
- Computer Science & Engg.
- Computer Science & Engg. (Data Science)
- Computer Science & Engg. (Cyber Security)
- Artificial Intelligence & Machine Learning
- Electrical Engineering
- Mining Engineering
Corporate Office : Somayya Campus, Akashwani Road, Wadgaon Ward, Chandrapur (M.S.), 9800004715, 9021986640

झी नाट्य गौरव २०२५ सर्वोत्कृष्ट नाटक
सर्वोत्कृष्ट 7 पुरस्कार विजेते नाटक

ज्याची त्याची love Story
शुक्रवार १२ सप्टें. रात्रौ.९ वा.
प्रियदर्शनी नाट्यगृह
तिकिट विक्री हॉलवर सुरू
- तिकिट बुकींग संपर्क -
9881126677
प्र.भू.: सुव्रत टिळक, सुरुचि आडारकर, रोहित हळदीकर, शर्मिला राजाराम शिंदे, शर्वरी बोरकर, पूर्णानंद वांढेकर
ऑनलाईन तिकिट विक्री सुरू
bookmyshow ticketalay

लोकमत CLASSIFIEDS classified online
क्लिक करा बुक करा
http://online.lokmatclassified.com

HOT PROPERTY
3 BHK FLAT FOR SALE
देवयानी टॉवर
3 बेडरूमचे स्वतंत्र फ्लॅट
साईट :- गुरूद्वारा च्या मागे, तुकूम चंद्रपूर.
Er.ZADE- 7083748027
Er.UTTARWAR- 8999762748
684399

नोकरीविषयक
Wanted (Male/Female) Site Supervisor & Marketing Executive Interview- 5/09/2025 & 9/09/2025, Time 2 To 6 PM., Ramteke And Associates, Near Bank Of Maharashtra. Tadoba Road, Tukum, Chandrapur. 9422135145, 9921481319. Note: Experience Candidate Will Be Selected, Bring Resume With Colour Photo. (685049)

नोकरीविषयक
स्वयंरोजगार
मल्टीनॅशनल कंपनी के साथ घर से पॉर्ट टाईम/फुल टाईम काम एवमं अनुभव की जरूरत नही, सबके लिए समान अवसर, ट्रेनिंग और मार्गदर्शन किया जायेगा. संपर्क करे :-मिना मॅम ,मो. 8600844309 (685072)

जाहिरात छोटी प्राप्ती मोठी
अधिक माहितीकरिता संपर्क करा - लोकमत कार्यालय- योगेश वैद्य मो. 9503447441, 9890653064, वामा साडीज चंद्रपूर मो. 9922930152, 9922930154.
खालील ठिकाणी पण छोट्या जाहिराती स्वीकारल्या जातात-
भवानी ॲंड साईकृपा सर्व्हिसेस, एकोरी वार्ड, चंद्रपूर मो. 9975932068 मंदे न्युज पेपर एजन्सी पडोली, चंद्रपूर मो. 7767061109 मंगल जीवने लोकमत शहर प्रतिनिधि बल्लारपुर, मो. 9922930149